# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.८६ दिनांक ०७.०९.२०२१

## केळवा व सफाळे पोलीस ठाणे यांचेकडुन अवैद्यरित्या रेती उत्खनन करणा-या आरोपीतांवर कारवाई

दिनांक.०६/०९/२०२१ रोजी सकाळी ०८.३० वाजता सुमारास वैतरणा ब्रिज क्र ९२ चे लगत वैतीपाडा गावचे खाडी कीनारी ता.जि. पालघर दक्षिणेस १५ कि.मी./केळवा बीट क्र.- ३ व मौजे कांदरवन येथे वैतरणा नदी किनारी ता.जि.पालघर येथे यातिल आरोपीत यांनी मा. जिल्हाधिकारी सो पालघर याचे कडील आदेश क्र.गृह/का टे-४/ मनाई आदेश/एस आर -३४/२०२१ दि.३०/०८/२०२१ चे कलम १४४ अन्वये च्या रेल्वे ब्रिज क्र.९२ व ९३ चे २ कीलोमिटर कार्यक्षेत्रामध्ये फौजदारी प्रकीया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये च्या मनाई आदेशाचे उलघन करुन शासनाची कोणतीही परवानगी नसताना अनधिकृतपणे विना परवाना रेती उत्खनन करुन पर्यावरणास धोका निर्माण होईल असे कृत्य करुन स्वत:च्या फायदयाकरिदया एकुण २१,७८,२७४/- रुपयांचा मुद्देमाल आरोपीत यांचे ताब्यात मिळुन आला असुन तो मा.तहसीलदार तथा दंडधिकारी, पालघर यांचे समक्ष जागीच नाश करण्यात आला आहे.

सदर घटनेबाबत आरोपीत यांचे विरुध्द केळवा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.४७/२०२१, ४८/२०२१, सफाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I ५६/२०२१, I ५७/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३७९,१८८,३४, सह जमीन महसुन अधिनियम १९६६ चे कलम ४८(७),पर्यावरण अधिनियम १९८६ चे कलम १५ प्रमाणे दिनांक-०६/०९/२०२१ रोजी दाखल करण्यात आलेले आहेत.

सदरची कारवाई श्री. धनाजी तोडसकर, उपविभागीय दंडाधिकारी, पालघर, श्री सुनिल शिंदे तहसीदार तथा दंडाधिकारी, पालघर, तसेच महसुल विभागातील स्टाफ, व सपोनि श्री. भीमसेन गायकवाड, प्रभारी अधिकारी केळवा सागरी पोलीस ठाणे, सपोनि श्री. संदीप कहाळे, प्रभारी अधिकारी सफाळा पोलीस ठाणे व केळवा व सफाळा पोलीस स्टाफ, यांनी संयुक्तरित्या केलेल्या अविश्रांत प्रयत्नांमुळे यशस्वी झाली आहे.

Scanned with CamScanner